पारावरच्या गप्पा

# ‘‘जशी हवा ; तसंच पीक लावा’’

## बदलणारं तापमान आणि निसर्गातल्या घडामोडींचा अभ्यास करून केलेली शेतीच ठरेल फायदेशीर



नित्यनियमाप्रमाणे देवदर्शन आटोपून संपत पारावर बसला होता. अर्थातच गणपतची वाट पाहत. गणपतनेही देवदर्शन घेऊन संपतजवळ बैठक मारली, मात्र संपतजवळ बसत असताना त्याच्या चेहऱ्यावर चिंता आणि विचार दिसत होते. त्यावर संपत हसून म्हणाला, ‘‘कारं गंपा, आज फारच चेहरा टाकून बसलाय, काय विचार करतोय एवढा?’’

त्यावर काळजीच्या स्वरात गणपत म्हणाला, ‘‘काही नाही रं गंपा. यावर्षी पिकांचं काही खरं दिसत नाही. हरभरा, गहू, कांदा या पिकांना जोरच नाही बघ. गहू तर फूट- दीड फुटावरच निसवला. आता काय बोंब पाडेल देव जाणे काढणीच्या वेळी. हरभऱ्याची वाढही चांगली नाही आणि पाहिजे त्या प्रमाणात घाटे लागले नाहीत. कांदा चांगला येईल असे वाटत होते परंतु सुरुवातीला थंडी नाही, आभाळ सतत येत होतं आणि धुकंही होतं. फवारण्या करून वैताग आला होता. आता काही दिवस थंडी पडली तीही जानेवारी- फेब्रुवारीमध्ये. त्याचा किती फायदा होईल कांद्याला माहीत नाही. परंतु कांद्याला म्हणावं असं तेज नाही. या सर्व पिकांना तेज नाही मग तूच सांग संपा, माझ्या चेहऱ्यावर तरी कसे तेज राहील? ’’

गणपतच्या या बोलण्याकडे बघून संपत मान डोलावत होता. संपतलाही हेच प्रश्न भेडसावत होते. अर्थात सर्वच शेतकरी या समस्यांतून जात आहेत. परंतु म्हणतात ना, निसर्गापुढे कोणाचे चालते? ‘‘गंपा, हे बघ, आता निसर्गापुढे आपण काय करू शकतो? आपण आपले काम करत राहायचे. हवामान कधी बदलेल, पिकाला ते पोषक किंवा घातक ठरेल हे आपल्याला सांगता येतं काय? मग आपण त्यावर एवढे नाराज होऊन, चेहरा पाडून बसण्यात किंवा विचार करून त्रास करून घेण्यात काय मजा आहे?’’

यावर मात्र गणपत आणखीनच वैतागला, ‘‘कारं संपा, आपण काय डोळं मिटत शांत बसायचं की काय? तुला नेमकं काय म्हणायचं मला समजत नाही. हे असंच चालू राहिलं तर पिकाची, शेतीची आणि पर्यायाने आपली वाट लागेल बघ. मागच्या

सीझनला पावसाने झोडलं. इकडून तिकडून जे काही हाती आलं त्याला बाजारभाव चांगला नाही. यामुळे काळजी वाटते बघ. यातून काहीच मार्ग निघू शकत नाही का रे संपा?''

यावर विचार करून संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, आता हवामानामध्ये बदल होत आहे. जुन्या काळी दसरा- दिवाळीपासून थंडी सुरू होत होती आणि संक्रांत- दांडी पौर्णिमेपर्यंत थंडी हळूहळू कमी होऊन होळीला थंडी गायब होत होती. मागील काही वर्षांपासून तुझ्या लक्षात येत असेल की अनेकदा थंडी डिसेंबरमध्ये सुरू होते आणि संक्रांत- दांडी पौर्णिमा यांचा काहीही विचार न घेता हीच थंडी फेब्रुवारी- मार्चपर्यंत राहाते. म्हणजेच हवामानामध्ये बदल झालेला आहे. प्रत्येक हंगाम जवळ जवळ एक महिना पुढे गेला. म्हणजेच पाऊस जूनऐवजी जुलैमध्ये येतो. सप्टेंबरमध्ये थांबणारा पाऊस ऑक्टोबरपर्यंत चालतो. त्यामुळे थंडीही उशिराच सुरू होते. यापूर्वी सांगितल्याप्रमाणे ऑक्टोबर- नोव्हेंबरमध्ये रब्बी हंगामामध्येही पिके घेतली जायची ती आता उशिरा करणे गरजेचे आहे. मी मागील चार- पाच वर्षांपासून प्रत्येक पिकाची लागवड १५ दिवस ते एक महिना उशिरा करतो. म्हणजेच गहू नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात करण्याऐवजी शेवटच्या आठवड्यात करतो. हरभरासुद्धा १५ ते २० दिवस उशिरा करतो. यावर्षी तर मी कांदा डिसेंबर महिन्याच्या शेवटी लावला. यामुळे तू पाहिले असेल माझी पिके चांगली आहेत, अर्थात एवढी चांगलीही नाहीत परंतु इतरांपेक्षा माझी पिके उजवी आहेत हे तुला माहीत आहे. म्हणून तुला सांगतो गंपा, यापुढे हवामानाचा विचार तसेच अभ्यास करून आज आपली शेती केली पाहिजे.''

खरं तर गणपतला पटत होते तरीही चिडून गणपत म्हणाला, ''हो संपा, आता एवढंच राहिलं. शेतीचा अभ्यास करा, मार्केटचा अभ्यास करा, विक्री व्यवस्था चांगली करा, ग्राहकांच्या मागणीनुसार पीक उत्पादन घ्या हे काय कमी झाले म्हणून आता हवामानाचा अभ्यास करा आणि शेती करा. एवढा अभ्यास करायला कधी वेळ असतो रे संपा. सतत शेतामध्ये गुरा-ढोरासारखं राबत राहायचं. रात्री अंथरुणाला कधी पाठ टेकवतो आणि झोप येते हे कळतच नाही आणि म्हणे अभ्यास करा. ज्यांना अभ्यास करण्याचे काम दिले, संशोधन करण्याचे काम दिले तसेच आपल्याला सल्ला देण्याचे काम दिले त्यांना चांगला पगार मिळूनही ते आपल्याला सर्व गोष्टींची माहिती वेळेवर का देत नाहीत? मला तरी नाही आठवत की हवामानात बदल झाल्यामुळे कोणती पिके कधी आणि कोणत्या महिन्यात करावी याबद्दल या मंडळींनी काही नवीन माहिती दिली म्हणून. जुन्या काळातलीच माहिती आजही दिली जाते. मग तूच सांग, कसं करायचं? आपणच आपलं स्वत:चं संशोधन आपल्या शेतात करायचं? प्रयोग करून आणखी तोट्यात गेलं तर काय होईल. माझं तर डोकंच चालत नाही बघ संपा.''

गणपतच्या बोलण्यामध्ये तथ्य असूनही संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, कोणीतरी येईल आणि आपलं दु:ख ऐकून त्यावर इलाज करेल यामध्ये अडकून राहिलो तर मग शेतीची वाट लागेल बघ. हवामानामध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहे हे तुला माहीत आहेच. जुन्या पारंपरिक पद्धतीप्रमाणे सणावारानुसार शेतीच्या कामाचे नियोजन करण्याचे दिवस गेले आता. जुन्या काळी निसर्ग शेतीला अनुकूल होता म्हणून पारंपरिक ज्ञानामुळे शेती चालत होती. परंतु आता हवामान शेतीला प्रतिकूल झालेले आहे. या प्रतिकूल परिस्थितीमुळे आपणच आपल्या प्रश्नांचे वाली आहोत. हवामान बदलले की शेतीमध्ये लगेच काहीतरी सुधारणा कराव्या लागतात. त्यामध्ये लागवडीची वेळ, खतांचा वापर,

कीड- रोगांपासून संरक्षण करण्यासाठी कीटकनाशकांचा वापर, पिकाची वाढ होत नसेल तर योग्य संजीवकांचा वापर करून पिकाची वाढ करून घेणे, पिकावर काही अन्नद्रव्यांची कमतरता असेल ती सुधारण्यासाठी योग्य उपाययोजना करणे यासारख्या अनेक उपाययोजना केल्या तरच आपण प्रतिकूल परिस्थितीमध्येही पिकाचे उत्पादन घेऊ शकतो. त्यामुळे आपण आपला अभ्यास केलाच पाहिजे. खरं तर शेतीमध्ये हुशार, शिकलेल्या लोकांनी येण्याची गरज आहे. कारण शेतीमध्ये कधी काय होईल हे सांगता येत नाही. तसेच जमीन, पीकही आपल्याशी काही बोलत नाही, सांगत नाही. अशा परिस्थितीमध्ये मग आपण अभ्यास करून त्यावर उपाययोजना राबविल्या पाहिजेत. आता आपणच अडाण्यांची शेती असं म्हणत बसण्यापेक्षा, अभ्यासू लोकांची शेती असे समजून योग्य ती उपाययोजना केली पाहिजे. आता बघ, थंडी संपल्यानंतर उन्हाळा लागेल. या उन्हाळ्यामध्ये पाण्याची कमतरता होते. तापमानात वाढ झाल्यामुळे पिकातून पाणी उडून जाते. या वाढलेल्या तापमानामध्ये पिकाच्या मुळांना चांगले काम करता येत नाही. यामुळे पाणी देऊनही अनेकदा पिके सुकलेली दिसतात. मग अशावेळी आपल्याला काही उपाययोजना करता येतील काय, याचा अभ्यास केला पाहिजे. म्हणजे पिकातून उडून जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी करता येईल काय? तसेच पिकांच्या मुळांची कार्यक्षमता वाढवून पिकाला जास्त पाणी शोषून घेण्यासाठी काही उपाययोजना करता येईल काय? किंवा जमिनीचे तापमान वाढू नये यासाठी काही उपाययोजना करता येईल काय? यासारख्या अनेक बाबी आहेत. यासाठी तज्ञ मंडळींना भेटलं पाहिजे. त्यांचे कार्यक्रम होतात त्यामध्ये सहभाग घेतला पाहिजे. फक्त टीव्ही, सिनेमा, कीर्तन यासारख्या कार्यक्रमांमध्ये जास्त वेळ घालण्यापेक्षा या प्रकारच्या कार्यक्रमांमध्येही सहभाग घेतला पाहिजे. चांगली मासिके, वृत्तपत्रे, पुस्तकेही आपल्याकडे ठेवली पाहिजेत. जेणेकरून त्यामध्ये दिलेल्या माहितीचा विचार करून आपणही आपल्या शेतीमध्ये काहीतरी बदल करू शकतो. म्हणून म्हणतो गंपा, काहीतरी वाचत जा. कारण वाचाल तरच वाचाल!''

यावर गणपत थोडासा गंभीर होऊन म्हणाला, ''हो रं संपा, तू म्हणतो तेही खरंच आहे. कारण जो दुसऱ्यावर अवलंबतो त्याचा कार्यभाग बुडतो बघ! आता दररोज वातावरण बदलतंय. कधी गारवा, तर कधी ढगाळ हवामान, कधी पावसाचा अंदाज तर कधी गारपिटीचा इशारा. या सर्व परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आपणच शहाणं व्हावं लागेल. नाहीतर इतरांच्या भरवशावर बसून नाही जमायचं. डोळ्यात तेल घालून शेती केली आणि निसर्गातील बदलांचा अभ्यास करून पिकांशी बातचीत करून प्रत्येक काम केले तर नक्कीच आपण या प्रतिकूल परिस्थितीतही चांगली शेती करू, खरं तर निसर्गाचा अभ्यास करूनच आपल्या पूर्वजांनी, ऋषिमुनींनी आपल्या शेती पद्धतीमध्ये संस्कृतीचा मेळ घातला होता. आता प्रगत विज्ञानाने त्यामध्ये काही बदल केले परंतु मला वाटतं संपा, आपण विज्ञान आणि अध्यात्म यांचा योग्य पद्धतीने मेळ घातला तर शेतीमध्ये चांगली प्रगती करू. मग हवामानात बदल असो की इतर कोणतीही समस्या, आपल्या कृषिप्रधान भारत देशाच्या इतिहासातील शेती पद्धतीला तिलांजली न देता तिला विज्ञानाचा आधार देऊन पुढे घेऊन जाणे गरजेचे आहे.''

यावर खूष होऊन संपत म्हणाला, ''वारं गंपा, अगदी छान बोलला बघ. पण यासाठी आपणच आपल्या शेतामध्ये लहान लहान गोष्टींचा वापर करून किंवा बदल करून प्रयोग करत राहिलो तरच आपण पुढे जगू शकतो. बरं चला आता, शेतावर पिके वाट पाहत असतील. चहा घेऊ आणि निघू बघ!''

**(सौजन्य: 'पूर्वा कृषिदूत' परिवार)** ■